# देवावर विश्वास ठेवणाऱ्या आंधळया माणसाला येशूने दृष्टी दिली पुढील पैकी

कोणताही कार्यक्रम मुलांसाठी निवडा.

**प्रार्थना** ''प्रिय देवा, तुझ्या आरोग्य देणाऱ्या सामर्थ्यावर बर्तीमय प्रमाणे दृढ विश्वास ठेवण्यास आमचे सहाय्य कर आणि आमच्या पातकांची क्षमा कर,''

**मार्क 10:46-52** मधून विश्वास असणाऱ्या आंधळ्याला येशूने कसे बरे केले ते पाहा.

वृत्तांत सांगण्यापूवी, येशूने बार्तीमयाला कसे बरे केले ते मुलांना ऐकायला सांगा, वृत्तांत सांगून झाल्यावर मुलांना विचारा:

- येशू येत असल्याचे समचल्यावर बार्तीमयने काय केले?
- बार्तीमयच्या आसपासच्या लोकांनी त्याला काय सांगितले?
- बार्तीमय हाका मारत असल्याचे ऐकून येशूने काय केले?
- येशूने बार्तीमयला काय विचारले?
- येशूने बार्तीमयला दृष्टी का दिली?

**कृती:** काही/मुलांचे डोळे बांधा ती बार्तीमयची भूमिका करतील. त्यांना विचारा.

- डोळे बांधल्यावर कसे वाटते?
- इतर मुलांनी बार्तीमयच्या आजूबाजूच्या लोकांची भूमिका करावी बार्तीमयला गप्प बसवण्यासाठी ते काय म्हणतील? (उत्तर: ते असे म्हणतील: ''येशू खूप कामात आहे.'' ''येशू तुला ओळखत नाही.'' ''तुझ्या स्वत:च्या पातकांची शिक्षा म्हणून तुला आंधळेपणा आला आहे.'' ''येशूच्या दृष्टीने तू महत्वाचा नाहीस'')
- असे बोलणाऱ्या लोकांना तुम्ही काय उत्तर द्याल त्याचा विचार करा.

नाट्यीकरण करा येशू बार्तीमयला दृष्टी देतो, मार्क 10:46-52.

- **मोठया मुलांनी** किंवा प्रौढांनी पुढील भूमिका कराव्या: **येशू, बार्तीमय** व **निवेदक.**

बार्तीमय जुने फाटलेले कपडे घालतो. प्रथम डोळे मिटून बसा.

- **लहान मुलांनी शिष्य** व **लोकसमुदास** ह्या भूमिका कराव्यात.

**निवेदक:** वाचा मार्क 10:46-52

**लोक:** ''पाहा पाहा! येशू येत आहे! देवाने अभिवचन दिलेला तारणारा!''

**बार्तीमय:** ''येशू दावीदाचे पुत्र, माझ्यावर दया करा!''

**लोक:** ए गप्प बस! उगाच त्या मोठया माणसाला त्रास देऊ नको!''

''शूऽऽ! आम्हांला येशूचे म्हणणे ऐकू देत!''

**बार्तीमय:** ''अहो दावीदपुत्र येशू माझ्यावर दया करा!''

**येशू:** ''थांबा!'' (येशू व लोक थांबतात.) म्हण ''त्याला इकडे बोलवा.''

**लोक:** ''धीर धर, ऊठ! तो तुला बोलावीत आहे. (त्याला हाताला धरून'' येशूकडे आणा. बार्तीमय त्याचा जुना झगा काढून फेकतो.)

**येशू:** ''मी तुझ्यासाठी काय करावे अशी तुझी इच्छा आहे?''

**बार्तीमय:** ''गुरूजी! मला दृष्टी प्राप्त व्हावी!''

**येशू:** (त्याच्या डोळ्यांना हात लावा) म्हणा, ''जा. तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे.''

**निवेदक:** ''लागलीच त्याला दृष्टी आली आणि तो वाटेने येशूच्या। मागे चालू लागला.''(नाटिकेसाठी मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना.)

**उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करून पुढील गोष्टींची मुलांसाठी व्यवस्था करा:**

- उपासनेच्या दरम्यान मोठया माणसांसमोर नाटिका सादर करणे.
- या अभ्यासाच्या सुरूवातीला दिलेले प्रश्न मोठया माणसांना विचारा.
- त्यांनी तयार केलेली कविता आणि अन्य गोष्टी सादर करा.

आंधळ्या मनुष्याचे **चित्र काढा** (नुसते डोक्याचे चित्र चांगले दिसत नसेल तर संपूर्ण माणसाचे चित्र काढा.)

- मोठया मुलांनी लहान मुलांची मदत करवी.
- येशूच्या सामर्थ्यावर आमचा विश्वास नसतो तेव्हा आमचीजीवने कशी असतात ते दाखवण्यासाठी डोळे बंद असलेल्या चेहऱ्याचे चित्र काढा.
- काढलेले चित्र मोठया माणसांना दाखवून त्याचा अर्थ स्पष्ट करा.



**कविता:** दोन मुलांना यशया 53:4 व 5 यातील प्रत्येकी एक वचन म्हणायला सांगा खरोखर आमचे व्याधी त्याने आपल्यावर घेतले, आमचे क्लेश त्याने वाहिले, तरी त्यास ताडण केलेले. देवाने त्यावर प्रहार केलेले व त्याला पीडिलेले असे आम्ही त्याला लेखिले.

खरे पाहिले असता तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला, आमच्या दुएर्कामुळे ठेचला गेला; आम्हांस शाती देणारी अशी शिक्षा त्यास झाली, त्यास बसलेल्या फटक्यांनी आम्हांस आरोग्य प्राप्त झाले. आज येशू लोकांना कसे आरोग्य देतो हे दाखवणारा प्रसंग त्यांनी पाहिला असेल तर त्यावर मोठया मुलांनी कविता, गीत, किंवा लहानशी कथा लिहावी अथवा साक्ष द्यावी.

**पाठ करा लूक 11:9**

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू तू आमचे आध्यात्मिक नेत्र व कान तुझे ऐकण्यावा व तुझ्या बोलण्यावर विश्वास ठेवण्यासाठी उघडलेस याबद्दल तुझे आभार मानतो. आम्हांला आरोग्य देव्याचे व आमच्या पातकांपासून आमचे तारण करण्याचे सामर्थ्य तुझ्या ठायी आहे म्हणून आम्ही धन्यवाद देतो. बार्तीमयप्रमाणे तुझ्या सामर्थ्यावर विश्वास ठेवून तुला हाक मारण्यास आमचे साहाय्य कर,

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net